# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

**दुरध्वनी क्र. 0712-2548572, 0712-2557273**

**E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in** **Website: rdtenagpur.org.in**


## गट क संवर्गातील अनुसूचित जमातीची पदे भरण्यासाठी जाहीरात

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर यांचे अधिनस्त संस्थेतील खालील तपशीलाप्रमाणे मा. सर्वोच्य न्यायालयाने सिव्हील अपील क्र. ८९२८/२०१५ व इतर याचीकास यामध्ये दिनांक ०६/०७/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयानुसार अ.ज. प्रवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरण्यासाठी पात्र उमेदवाराकडून शासनाने दिलेल्या निर्देशानुसार स्पर्धा परीक्षेसाठी अर्ज मागविण्यात येत आहे. अर्ज करण्याची शेवटची तारीख दि. ०६/०१/२०२० रोजी ५.०० वाजेपर्यंत राहील. अर्जाचे लिफाप्यावर ठळक अक्षरात “निदेशक (तांत्रिक प्रयोगशाळा सहायक) “ या पदासाठी अर्ज असे लिहण्यात यावे. नमूद केलेल्या दिनांकानंतर व टपालाचे दिरंगाईने उशीरा प्राप्त झालेले अर्ज स्विकारले जाणार नाही, याची नोंद घ्यावी. जाहीरातीमध्ये नमूद करण्यात आलेले पद नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा, गोंदीया व भंडारा जिल्हयातील आहेत.जाहीरात या कार्यालयाचे वेबसाईट www.rdtenagpur.org.in वर Download Section मध्ये प्रसिद्ध करण्यात आली आहे.

| अ. क्र. | पदनाम | भरतीसाठी प्रस्तावित पदे | सामाजिक व समांतर आरक्षण | किमान शैक्षणिक अर्हता व अनुभव | परीक्षेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| संवर्ग : गट - क | | | | | |
| १ | निदेशक (तांत्रिक प्रयोगशाळा सहायक) वेतन वेतनस्तर लेवल एस - ८, २५५००-८११०० | १ | अनुसूचित जमाती | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे / समकक्ष शासनामान्य स्वायत्त अभियांत्रिकी शाखेतील तीन वर्षीय पदविका (Engineering and Technology) उत्तीर्ण, आणि शासकीय किंवा निमशासकीय किंवा खाजगी, संस्था किंवा आस्थापना, किंवा शासन अंगीकृत महामंडळामधील प्रयोगशाळा सहाय्यक किंवा साईट सुपरवायजर पदावर, किंवा त्याने धारण केलेल्या पदविकेच्या विद्याशाखेशी संबंधीत मॅन्युफॅक्चरींग किंवा सर्व्हिसींग किंवा मेंटेनन्स किंवा सीएनसी मशीन हाताळण्याचा रोजंदारी किंवा कार्यव्ययी किंवा करार पद्धतीवर किंवा मानधन इत्यादी स्वरुपात पुर्णवेळ कामाचा एक वर्षाचा अनुभव | लेखी परीक्षा |

**वर नमूद केलेल्या पदसंख्येमध्ये बदल होवू शकते. काही अपरीहार्य कारणाने परिक्षा स्थगीत झाल्यास त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परीक्षा स्थगीत करणे व रद्द करणे, अंशत: बदल करणे, तसेच सेवाभरती प्रक्रीयेत बदल करणे याबाबतचे सर्व अधिकर सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर यांचा निर्णय अंतीम राहील.**

**अर्ज सादर करण्याची पद्धत व अर्ज पाठविण्याचा पत्ता :** इच्छुक व अहर्ताप्राप्त उमेदवारांनी Download Section मधून अर्जाचा नमुना व इतर प्रमाणपत्र Download करुन घेवून परीपुर्ण भरलेले अर्ज आवश्यक प्रमाणत्राच्या सांक्षांकीत प्रतिसह सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, शासकीय तंत्रनिकेतन परीसर, मंगळवारी बाजार, सदर, नागपूर - ४४० ००१ या पत्यावर दिनांक ०६/०१/२०२० रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत पोहचतील याची दक्षता घ्यावी. (परीक्षेचे अर्ज स्वहस्ते: / डाकेने सादर करावीत.)

**परीक्षा शुल्क** : गट - क लेखी परीक्षेकरीता अ.ज. प्रवर्गातील उमेदवारांसाठी परीक्षा शुल्क रु. ४५० /- असून सदर परीक्षा शुल्क JOINT DIRECTOR OF TECHNICAL EDUCATION, R.O., NAGPUR PAYBLE AT NAGPUR यांच्या नावे काढलेला कोणत्याही राष्ट्रीयकृत बॅकेचा डी.डी. (DEMAND DRAFT) व्दारे अर्जासोबत द्यावे लागेल. अन्य नावाने काढलेला व राष्ट्रीयकृत बॅकेतून न काढण्यात आलेला तसेच कमी रकमेचा डी.डी. स्विकारला जाणार नाही. परीक्षा शुल्क हा नापरतावा राहील. कोणत्याही कारणास्त ते परत केले जाणार नाही.

**परीक्षा स्थळ : शासकीय तत्रनिकेतन, मंगळवारी बाजार, सदर, नागपूर - ४४० ००१**
**परीक्षेचा दिनांक : १२/०१/२०२०**
**परीक्षेची वेळ : दुपारी १२.०० वाजता**

**सर्वसाधारण सुचना व अटी :**

१. अर्जदार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा.

अ) उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नसल्यास त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्यास जन्म दाखला सादर करणे आवश्यक राहील.

आ) सदर उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्मतारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास त्या उमेदवाराने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतू शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक राहील.

इ) उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

२. उमेदवाराने अर्ज केला किंवा विहित अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेला बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

३. उमेदवाराने सादर केलेल्या अर्जांची प्राथमिक छाननी न करता, उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी तात्पुरता प्रवेश दिला जाईल.परीक्षेतील पात्र उमेदवारांची कागदपत्र तपासणी, चारीत्र तपासणी, वैद्यकीय तपासणी करुनच नियुक्ती साठी पात्र ठरविण्यात येईल.

४. मागासवर्गीय प्रवर्गातील आरक्षण हे महाराष्ट्र राज्याच्या अधिवासी उमेदवारापुरते मर्यादीत राहील. आरक्षित मागास प्रवर्गाच्या जागा दावा करणाऱ्या उमेदवारांना त्या संदर्भातील सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले जात प्रमाणपत्र व उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्राची मुळ व साक्षांकीत प्रत कागदपत्रे पडताळणीच्या वेळेस सादर करणे आवश्यक राहील.

५. (एक) एकोणवीस वर्षापेक्षा कमी वय नसलेल्या आणि अडतीस वर्षापेक्षा जास्त वय नसलेल्या (आरक्षीत गटातील उमेदवारासाठी पाच वर्षापर्यंत उच्च् वयोमर्यादा शिथील केली जाऊ शकते) ; आणि

(दोन) पदविका धारण करणाऱ्या ; आणि

(तीन) शासकीय किंवा निमशासकीय किंवा खाजगी, संस्था किंवा आस्थापना, किंवा शासन अंगीकृत महामंडळामधील प्रयोगशाळा सहाय्यक किंवा साईट सुपरवायजर पदावर, किंवा त्याने धारण केलेल्या पदविकेच्या विद्याशाखेशी संबंधीत मॅन्युफॅक्चरींग किंवा सर्व्हिसींग किंवा मेंटेनन्स किंवा सीएनसी मशीन हाताळण्याचा रोजंदारी किंवा कार्यव्ययी किंवा करार पद्धतीवर किंवा मानधन इत्यादी स्वरुपात पुर्णवेळ कामाचा एक वर्षाचा अनुभव धारण करणाऱ्या ;

उमेदवारामधून नामनिर्देशनाव्दारे करण्यात येईल.

६. निदेशक (तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक) या पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीने, या बाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, हिंदी व मराठी भाषा परीक्षा अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सुट मिळालेली नसेल, तर तिला सदर परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

७. निदेशक (तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक) पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीने, महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहीत केलेले संगणक संचलन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

८. निदेशक (तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक) पदावर नियुक्त केलेल्या व्यक्ती, नियुक्त केलेल्या प्रादेशिक विभांगांतर्गत कोठेही बदलीस पात्र ठरेल.

९. प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्त / अपंग उमेदवारासाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष

१०. अत्युच्च गुणवंत्ताधारक मागासवर्गीय खेळाडू कमाल वयोमर्यादा ४८ वर्ष

११. भुदल, हवाईदल किंवा नाविक दल सेवेमध्ये सहा महिणे व त्यापेक्षा अधिक सेवा केली असेल तर संरक्षण सेवेमध्ये केलेली एकूण सेवा अधिक तीन वर्ष हा कालावधी माजी सैनिकांचे वय मोजताना कमी केला जाईल.

१२. स्वातंत्र सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, जणगनना कर्मचारी व सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी यांना वयोमर्यादा ४५ वर्ष .

१३. अंशकालीन पदवीधर / पदविकाधारक उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ५५ वर्ष.

१४. शासनाच्या सेवेतील कर्मचाऱ्यांना उच्च वयोमर्यादा लागू नाही. अर्जदार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा.

१५. जात वैधता प्रमाणत्र उपलब्ध नसल्यास महाराष्ट्र शासन प्रशासन विभाग शा.नि.क्र. बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११११६ व दि. १२/१२/२०११ मधील तरतुदीनुसार आदेश निर्गमीत केल्याच्या दिनांकापासून सहा महिण्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा त्यांची नियुक्ती पुर्वलक्षीपने रद्द करण्यात येईल.

१६. जाहीरातीतील पदासाठी लेखी परीक्षा अणिवार्य आहे, उमेदवारांना मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. तांत्रिक प्रयोगशाळा सहायक या पदाकरीता लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, बौद्धिक चाचणी इ. विषयांवरील प्रश्नांकरीता समान गुण ठेवून दिड तासाकरीता २०० गुणांची वस्तुनिष्ठ बहूपर्यायी लेखी परीक्षा घेण्यात येईल व त्यआधारे गुणवत्तेनुसार निवड केली जाईल. उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. परीक्षेस गैरहजर राहील्यास उमेदवार अंतीम निवडीसाठी अपात्र ठरेल.

१७. **उमेदवारांना समान गुण मिळाल्यास :** लेखी परीक्षेचा निकाल तयार करतांना परीक्षेत ज्या पात्र उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता यादीमधील प्राधान्यक्रम पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येईल;

i) आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या पाल्यास प्रथम प्राधान्य राहील.

ii) समान गुण प्राप्त उमेदवारामध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य नसेल अथवा वरील क्र. (i) नुसार एकापेक्षा अधिक उमेदवार समान गुण प्राप्त असतील तर त्यापैकी वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

iii) वरील अनुक्रमांक (i) व (ii) या दोन्ही अटीन मधील देखील समान ठरत असलेल्या उमेदवाराच्या बाबतीत, अर्ज सादर करण्याच्या अंतीम दिनांकास उच्चतर शैक्षणिक अहर्ता धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

iv) वरील अनुक्रमांक (i) ,(ii) व (iii) या तिन्ही अटीनमध्ये देखील समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत सदर पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये विहीत असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेध्ये उच्चतर गुण प्राप्त उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

१८. लेखी परीक्षेमध्ये फक्त काळया / निळया शाईच्या बॉल पेनचा वापर करणे बंधनकारक आहे.

१९. पदभरतीची प्रक्रीया अंत्यंत तर्कशुद्ध व पारदर्शक पद्धतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार असल्याने कोणीही कोणत्याही प्रलोभनांना बळी पडू नये. एखाद्या अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्यास निवड प्रक्रीयेतून अपात्र ठरविले जाईल.

२०. निवड प्रक्रीयेदरम्यान व तद्‌नंतर उमेदवाराने सादर केलेली प्रमणपत्रे संशयास्पद वा अयोग्य / अपर्याप्त आढळल्यास उमेदवाराची निवड / नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द केली जाईल.

२१. उमेदवाराणे एकूण गुणाच्या किमान ४५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

२२. निदेशक (तांत्रिक प्रयोगाळा सहायक) या पदाकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी संगणक हाताळणी / वापराबाबतचे पुढे नमूद केलेले प्रमाणपत्र नियुक्ती दिनांकापासून दोन वर्षाच्या आत सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा त्याची सेवा समाप्त होईल. D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A किंवा B स्तर किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ मुंबई यांच्याकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

२३. शैक्षणिक अहर्ता , वय , अनुभव , अधिवास दाखला तसेच जातीचा दाखला उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र इ. प्रमाणपत्रांच्या सांक्षाकीत व मुळ प्रती कागदपत्रे तपासणीच्या वेळेस सादर करणे आवश्यक आहे.

२४. उमेदवाराने शेक्षणिक अहर्तेच्या स्वत: सांक्षाकीत केलेल्या प्रति अर्जासोबत सादर कराव्यात. तसे नसल्यास किंवा चुकीची माहिती असल्यास अर्ज अपुर्ण समजून नाकारला जाईल.

२५. शासकीय / निमशासकीय सेवेतील संबंधीत प्रवर्गातील कर्मचाऱ्यांनी नारहकत प्रमाणपत्र कागदपत्रे पडताळणीच्या वेळेस सादर करणे आवश्यक राहील.

२६. जाहीरातीमधील पदासाठी अर्ज करणाऱ्या विवाहीत उमेदवारांनी त्यांच्या अर्जासोबत शासन अधिसुचना एसआरव्ही-२०००/प्र.क्र.(१७/२०००)/बारा, दि. २८/०३/२००५ नुसार नमुना अ नियम ४ प्रमाणे लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र कागदपत्रे पडताळणीच्या वेळेस सादर करणे बंधणकारक राहील, सदरचे प्रतिज्ञापत्र प्राप्त न झाल्यास संबंधीत उमेदवाराचा अर्ज रद्द करण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी.

२७. शासन निर्णय क्र. अनियो-१००५/१२६/सेवा-४, दि. ३१/१०/२००५ मधील तरतूदीनुसार नियुक्तीसाठी निवड झालेल्या उमेदवारांना नविन अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील.

२८. वित्त विभाग परीपत्रक क्र. अनियो१००५/१२६/सेवा-४, दि. १२/०१/२००७ व वित्त विभाग परीपत्रक अनियो१००९/१३/सेवा-४, दि. २४/०२/२००९ मधील सर्व अटींची पुर्तता होत असल्यासच शासकीय कर्मचाऱ्यास महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू राहील.

२९. रोजगार व स्वयमरोजगार विभाग अथवा अन्य अधिकृत विभागाकडे नोंदणी केली असल्यास अध्ययावत नोंद पत्राची छायांकीत प्रत सादर करणे बंधनकारक राहील.

३०. जाहीरातीत नमूद केल्याप्रमाणे पात्रता धारक असल्याची खात्री करुनच उमेदवाराने अर्ज करावे.

३१. ज्या अपंग उमेदवारास लेखणिक नियमानुसार अनुज्ञेय आहे, अशा उमेदवारांनी लेखणीकाची व्यवस्था स्वत: करावी व लेखणिक संबंधीत पदाच्या किमान शैक्षणिक अर्हतेपेक्षा एक इयत्ता कमी शिकलेला असावा. त्यास लेखी परीक्षेसाठी प्रति तासासाठी २० मिनिटे अतिरीक्त वेळ देण्यात येईल. उमेदवाराला लेखणिकास स्वत: मानधन द्यावे लागेल. लेखणिकाला परीक्षेचे नियम व अटींचे पालन करावे लागेल. लेखणिकाने परीक्षा कालावधीत उमेदवाराशी चर्चा / गप्पा मारु नये. अथवा उमेदवाराशी निरर्थक बोलू नये. फक्त दृष्टीहीन / अल्पदृष्टी / अस्तीव्यंग / शेरेबल फाल्सी आणि डिस्लेस्कीयाने बाधीत व किमान ४० टक्के विकलांगता असलेल्या पात्र उमेदवारांना ते लिहण्यासाठी सक्षम नसलेल्या पात्र उमेदवारांना लेखणिकाची मदत अथवा फक्त अनुग्रह कालावधी आवश्यक असल्यास संबंधीत उमेदवाराने अर्ज स्विकारण्याच्या अंतीम दिनांकापासून पाच दिवसाच्या आत लेखणिकाचा तपशील / सविस्तर माहिति वैदकीय पुराव्यासह नाव , पत्ता, शैक्षणिक अहर्ता, ओळखीच्या पुराव्याची छायांकीत प्रत सादर करावी.

३२. अपंग उमेदवाराकरीता जिल्हा शल्य चिकीत्सक यांनी निर्णमीत केलेले अपंगत्वाचे टक्केवारीचे प्रमाणपत्र ४० टक्के पेक्षा कमी नसावे.

३३. अनुभवाच्या बाबतीत तासीका , नियतकालीक, अर्धवेळ, विद्यावेतन, अभ्यागत, विनावेतन तत्वावर केलेल्या अंशकालीन सेवेचा कालावधी तसेच प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी, अतिरीक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राह्य धरता येणार नाही, अंशकालीन कर्मचाऱ्यांनी त्यांच्या अनुभवाची सेवा योजन कार्यालयाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे व तसे केल्याचे पुरावे कागदपत्रे पडताळणीच्या वेळेस सादर करणे बंधणकराक राहील.

३४. अंतरीम निवड यादीमध्ये पात्र उमेदवारांच्या सांक्षाकीत प्रती मुळ प्रमाणपत्राच्या आधारे कागदपत्र तपासणीच्या वेळी तपासण्यात येतील. सदर प्रमाणपत्रांच्या मुळ प्रती कागदपत्रे तपासणीच्या वेळी उपलब्ध करुन देणे उमदवारावर बंधकारक राहील. त्यामधील प्रमाणपत्रे उपलब्ध करुन न दिल्यास तसेच खोटी किंवा चुकीची आढळल्यास संबंधीत उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल. तसेच निवड प्रक्रीया सुरु झाल्यानंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी नियुक्ती प्रकीयेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल / शासकीय सेवेत असल्यास बडतर्फ करण्यात येईल.

३५. निवड झालेल्या उमेदवारांना प्रचलित नियमाप्रमाणे वेतन व भत्ते लागू राहील.

३६. परीक्षेच्या वेळी उमेदवाराने अर्जासोबत संलग्न केलेले परीक्षेसाठीचे ओळखपत्र आणने अनिवार्य आहे. उमेदवाराने प्रवेशपत्राशिवाय स्वत:चे छायाचित्र असलेले ओळखपत्र जवळ बाळगणे आवश्यक राहील. (उदा. आधार कार्ड, पॅन कार्ड, निवडणूक ओळखपत्र, वाहन चालविण्याचा परवाना इ.)

३७. **उमेदवाराने परीक्षेचा अर्ज सादर केल्यानंतर अर्जासोबतचे परीक्षेसाठीचे ओळखपत्र व स्वत:चे छायाचित्र असलेले ओळखपत्र (उदा. आधार कार्ड, पॅन कार्ड, निवडणूक ओळखपत्र, वाहन चालविण्याचा परवाना इ.) घेवून दिनांक १२/०१/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता शासकीय तंत्रनिकेतन, मंगळवारी बाजार, सदर, नागपूर या परीक्षा केंद्रावर परीक्षेकरीता उपस्थित राहणे अनिवार्य आहे.**

३८. उमेदवारांचे आसन क्रमांक व बैठक व्यवस्थेबाबतची माहिती या कार्यालयाच्या संकेतस्थळावर परीक्षेच्या एक दिवस आधी उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच अद्यावत माहितीकरीता उमेदवारांनी या कार्यालयाचे वेबसाईट www.rdtenagpur.org.in वर वेळोवेळी माहिती पाहावी.

स्वा /-

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

कार्यालयीन उपयोगाकरीता

आवक क्रमांक : ................ आसन क्रमांक.........................

प्रति,

**सहसंचालक,**
**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,**
**शासकीय तंत्रनिकेतन परीसर, मंगळवारी बाजार,**
**सदर, नागपूर**

फोटो

विषय :- निदेशक (तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक) या पदासाठी अर्ज

१. उमेदवाराचे संपुर्ण नाव ........................................................................................
( आडनाव ) (स्वत:चे नाव ) (वडीलांचे / पतीचे नाव)

२. लिंग : पुरुष / स्त्री (लागू नसेल ते खोडावे)

३. पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता : ..........................................................................................
(पिनकोड क्रमांकासह)............................................................................ ......................
............................... ..........................................................................................

४. अ) दुरध्वनी क्रमांक (एसटीडी सह) ............................. ब) भ्रमणध्वनी क्रमांक .................................

५. जात (पोटजातीसह) .........................................................................................................

६. जन्मतारीख ....................................................................................................................
(वयाचा दाखला किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्यावर नोंद केल्याप्रमाणे)

७. दिनांक २७/१२/२०१९ रोजीचे वय .................... वर्ष.......................... महिने ............................

८. विवाहीत / अविविहीत ........................................................................................................
(विवाहीत असल्यास लहान कुटूंब असल्याचे नमूना अ मधील प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक आहे.)

९. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयाचे नाव , पता, नोंदणी क्रमांक व तारीख (असल्यास)................
..............................................................................................................................

१०. धनाकर्ष क्रमांक (D.D. No.) ....................................... दिनांक................. रक्कम .....................
(D.D. in favour of Joint Director, Technical Education, R.O. Nagpur payble at Nagpur)
बॅकेचे नाव ..........................................................................................................

११. महाराष्ट्र राज्याचा रहीवासी आहे किंवा नाही ...............................................................................

१२. शैक्षणिक अर्हता : (SSC पासून पुढे)

| परीक्षा | उत्तीर्ण होण्याचे वर्ष | शाळा / विभागीय मंडळ / विद्यापीठ / संस्था | गुणांची टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१३. अनुभव :

| अ. क्र. | शासकीय / निमशासकीय / अशासकीय आस्थापनेचे नाव | पदनाम | वेतनश्रेणी | सेवेचा कालावधी | | | | नियमित/ कंत्राटी / हंगामी / अंशकालीन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पासून | पर्यंत | वर्ष | महिने | |
| १ | | | | | | | | |
| २ | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

१४. विहीत संगणक परीक्षा उत्तीर्ण : होय / नाही
१५. उमेदवार माजी सैनिक आहे काय ?: होय / नाही, अपंग आहे काय? : होय / नाही
१६. उमेदवाराविरुद्ध विभागीय चौकशी चालू / प्रलंबीत / प्रस्तावित आहे काय ? : होय / नाही
१७. उमेदवारावर फौजदारी खटला होवून शिक्षा झाली आहे काय ? : होय / नाही
१८. उमेदवारावर फौजदारी खटला प्रलंबीत आहे काय ? : होय / नाही

मी याव्दारे जाहीर करतो / करते की, माझ्या माहिती व ज्ञानानुसार वरील तपशील सत्य व अचुक आहे. कोणताहि तपशील खोटा आढळल्यास माझी उमेदवारी / नियुक्ती रद्द झाल्यास अथवा होणाऱ्या कार्यवाहीस मी पात्र असेल. अर्ज परिपुर्ण नसल्यास अथवा पृष्ठार्थ आवश्यक कागदपत्रे जोडली नसल्यास अर्ज रद्दबातल ठरविला जाईल व त्याबाबत मला काहीही कळविले जाणार नाही. याची मला जाणीव आहे. मी प्रतिज्ञापुर्वक असे जाहीर करतो की, वरील माहिती जाणिवपुर्वक व विश्वासपुर्वक दिली असून ती खरी आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यास माझे अर्ज फेटाळून लावण्यास किंवा निकडीच्या कोणत्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास माझी काहिही तक्रार / हरकत राहणार नाही. जाहिरातीतील सर्व अटी व शर्ती मी वाचल्या असून त्या मला मान्य आहेत.

ठिकाण :
दिनांक :

अर्जदाराची सही

**सोबत जोडलेली प्रमाणपत्रे :**

१. शैक्षणिक अर्हता
२. वयाचा पुरावा
३. मागासवर्गीय असल्याचा पुरावा
४. लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र
५. अनुभवाचा पुरावा
६. संगणक हाताळणी / वापरा बाबतचे प्रमाणपत्र
७. वय / राष्ट्रीयत्व व अधिवास प्रमाणपत्र
८. दिव्यांग असल्यास पुरावा (लेखणिकाची मदत घेणार असल्यास जाहिरातीमधील अटी व शर्तीनुसार कागदपत्रे)
९. इतर आवश्यक प्रमाणपत्रे

.........................................................................................................................................

महाराष्ट्र नागरी सेवा नियम (लहाण कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र ) नियम - २००५ मूधील प्रतिज्ञापत्राचा नमुना - अ प्रतिज्ञापत्र (विवाहीत उमेदवारासाठी)

**नमूना - अ**

**(नियम - ४ पहा)**

मी श्री. / श्रीमती/ कु. ..........................................................................................................
श्री. ............................................................................... यांचा मुलगा / यांची मुलगी / पत्नी वय ........................ वर्ष , राहणार ..........................................................................................
याव्दारे पुढीलप्रमाणे असे जाहिर करतो / करते की,

१. मी .................................. या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.
२. आज रोजी मला ........... (संख्या) इतके हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलाची संख्या ......... आहे. (असल्यास जन्मतारीख नमूद करावी.)
३. हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुला मुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

ठिकाण:
दिनांक :

अर्जदाराची सही

.........................................................................................................................................

(सदर ओळखपत्र परीक्षेकरीता येताना सोबत आणावे तसेच त्यासोबत मुळ आधारकार्ड / पॅनकार्ड / निवडणूक ओळखपत्र / वाहन परवाना इ. कागदपत्रे सोबत आणावे. )

## परीक्षेसाठी ओळखपत्र

पासपोर्ट आकाराचा फोटो चिटकवून तो सांक्षांकीत करावा.

१. पदाचे नाव : **निदेशक (तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक )**
२. उमेदवाराचे संपुर्ण नांव :..................................................................
३. परीक्षेचा आसन क्रमांक * ..................................................................
४. परीक्षा केंद्र : **शासकीय तंत्रनिकेतन, मंगळवारी बाजार, सदर, नागपूर-४४० ००१**
५. परीक्षेचा दिनांक व वेळ : **१२/०१/२०२०, वेळ : दुपारी १२.०० वाजता**
६. उमेदवाराची स्वाक्षरी :.....................................................................

(फोटो राजपत्रित अधिकारी / विशेष कार्यकारी अधिकारी किंवा शाळेचे मुख्याध्यापक / प्राचार्य यांनी सांक्षांकीत करणे आवश्यक आहे.)

टिप : १. सर्व उमेदवारांनी परीक्षेपुर्वी एक तास अगोदर परीक्षा केंद्रावर हजर राहावे.
*२.उमेदवारांचे आसन क्रमांक व बैठक व्यवस्थेबाबतची माहिती या कार्यालयाच्या संकेतस्थळावर परीक्षेच्या एक दिवस आधी उपलब्ध करुन देण्यात येईल.